# <u>गुरू पुजा दिवस गीत</u>

गुरू वचनाला , SSS वचनाला देऊ मान
गुरू पुजा ही, पुजा ही आहे महान........||धृ||

सद्‌गुरू स्वरूप आठवावे
मन मंदिरी साठवावे
सद्‌गुरूचे, गाऊ सदा गुणगान...........||१||
गुरूपुजा ही

प्रेम विनयता आपुलकी
श्रद्धा नी आदर माणुसकी
गुरूभक्तांचा, सदा करू सन्मान..........||२||
गुरूपुजा ही

बोलुनी भाषा ही प्रेमाची
भक्ति करावी ही नेमाची
सद्‌गुरूला, प्रेमाचं मागु दान...........||३||
गुरूपुजा ही

गुरूवचनाला जागावं
समीप दान हे मागावं
“परशुरामा” हे, जीवन घडवु छान......||४||
गुरूपुजा ही

**(चालः चांदण चांदण झाली रात ...........)**